पूर्वा
कृषिदूत
प्रबोधनातून परिवर्तन... मासिक

संस्थापक संपादक
**डॉ. बी.बी. पवार**

संपादक
**डॉ. भास्कर गायकवाड**

संपादन सहयोग
**पराग वाड**

चित्रांकन आणि मांडणी
**कैलास भामरे**

मुखपृष्ठ
**विजय सैंदाणे**

व्यवस्थापक - लेखा विभाग
**राजेंद्र बागुल**

सहकार्य
**विजय पवार**
संचालक, पूर्वा ॲग्रोटेक

**सुहास कदम**
संचालक, पूर्वा ॲग्रो मार्केटिंग

**महेश पाटील**
संचालक, पूर्वा केमटेक, खान्देश

**विजय नाईकरे**
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, पुणे

**सचिन दिघे**
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, संगमनेर

**रईस इनामदार**
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, कोपरगाव

**नंदकिशोर चतरकर**
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, विदर्भ

**संजय पाटील**
विभागीय व्यवस्थापक- पूर्वा केमटेक, मराठवाडा

■

**पूर्वा केमटेक प्रा.लि.,**

एम ११३, एमआयडीसी अंबड,

नाशिक-४२२०१०
मो. ७४२००१४७८१
email:poorvakrushidoot@gmail.com

# संपादकीय

## स्वयंरोजगार, आर्थिक समृद्धी आणि आरोग्य रक्षणासाठी मधमाशी पालन



**डॉ. भास्कर गायकवाड**
(संपादक : 'पूर्वा कृषिदूत')
मो. ९८२२५१९२६०
gaikwadbh@yahoo.com

- **मधमाशीची मौलिकता भारतीयांनी वेदकाळापासूनच ओळखली**
- **मधाची सर्वतोपरी उपयुक्तता विज्ञानानेही केली सिद्ध**
- **पीकवृद्धी आणि सृष्टिचक्रात मधमाशी 'हुकुमाची राणी'**
- **मधमाशी पालनाविषयी जनजागृती मात्र अतिशय संथगतीने**
- **शास्त्रीय प्रशिक्षणातूनच केला पाहिजे मधु-व्यवसाय**
- **शासनासह खासगी पातळीवरही प्रबोधन- कृतिकार्यक्रम गरजेचे**

हजारो वर्षांचा इतिहास असलेल्या आणि पूर्वजांनी शिळाचित्रे- भित्तीचित्रांमध्ये मोलाचे स्थान दिलेल्या मधमाशीला आपण खरंच विसरत चाललो आहोत. आपले पूर्वज साखर- गुळाच्या आधी मधाचा वापर गोड पदार्थ म्हणून करत असत. आयुर्वेदिक औषधांमध्येही मधाला मोलाचे स्थान आहे. माणूस जन्माला आल्यापासून ते त्याच्या दशक्रिया विधीपर्यंत मधाला महत्त्व आहे. आजही दशक्रियेसाठी दूध, गोमूत्र, शेण यांबरोबरच मधही लागतो. खरं तर यावर आपण कधीच विचार केला नाही. (माणूस जिवंत असेपर्यंत त्याने किती वेळा मध सेवन केला असेल, ते सांगणे कठीण आहे. परंतु हिंदू धर्मानुसार त्याच्या दशक्रियेसाठी मात्र मधाची बाटली विकत घ्यावीच लागते!) संस्कृतीमागच्या या शास्त्राचा आपण कधीतरी विचार केला आहे काय? जसे दूध हे मानवाचे पूर्ण अन्न आहे तसे शेण- गोमूत्र हे आपल्या दुसऱ्या आईचे म्हणजे भूमाता- जमिनीचे पूर्ण अन्न आहे. या तीन गोष्टी मिळविण्यासाठी आपण गोमातेचे संवर्धन करतो. आपल्या अनेक पूजा- पाठांमध्ये तसेच आयुर्वेदिक उपचार पद्धतींमध्ये मधाचा अंतर्भाव केला जातो. इतके असूनही जी मधमाशी मधाची निर्मिती करते तिच्या संरक्षण- संवर्धनाचा विचार आपण कधी केला आहे काय? पूर्वजांनी मधमाशीला एवढे महत्त्व का दिले असेल याचाही आपण कधीही विचार केला नाही. ऋषिमुनींनी यासंदर्भात फार चिंतन करून आपल्या समाजामध्ये रूढी- परंपरा सुरू केल्या. ऋषिमुनींना शास्त्र कळत होते. परंतु समाजाला शास्त्र कळणार नाही म्हणून त्यांनी परंपरा सुरू करून दिल्या. अध्यात्माच्या माध्यमातून त्यांनी शास्त्राला श्रद्धेचा आधार देत संस्कृतीचा पाया रोवला. शास्त्राला अध्यात्माची जोड देऊन मानवाला श्रद्धा शिकवली. आज आपल्याला शास्त्र कळायला लागले परंतु 'शास्त्र जाणणाऱ्या' समाजाने मात्र या

श्रद्धेचे रुपांतर अंधश्रद्धेमध्ये केले. ही खरंच मोठी शोकांतिका आहे.

### मधमाशीचे महत्त्व पूर्वजांनी जाणले

पूर्वजांनी मधमाशीला महत्त्व देण्याची मुख्य दोन कारणे- एक म्हणजे मधमाशीपासून मानवी आरोग्य संपदा चांगली ठेवण्यासाठी अनेक पदार्थांचे उत्पादन होते. दुसरे म्हणजे मधमाशीमुळे पिकांचे परागीभवन- प्रजनन होते तसेच अनेक पिकांचे उत्पादन अनेक पटींनी वाढते. मधमाशी फुलांमध्ये परागीभवनाची सेवा देत असते. परंतु दुर्दैवाने ५०-६० वर्षांपूर्वी शेताच्या बांधावरील झाडाझुडुपांत आढळणारी मधमाश्यांची असंख्य पोळी आता नष्ट झाली आहेत. निसर्गाने परागीभवनाची मोफत दिलेली सेवा आता बंद झाली आहे. मागील दोन- तीन वर्षांपासून तर बातम्या वाचायला मिळतात, की कांदा बीजोत्पादनामध्ये मधमाशी न आल्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान, मधमाशी शेतात न आल्यामुळे शेवग्याला शेंगा लागल्या नाहीत, मधमाशी नसल्यामुळे अनेक फळझाडांची फुलगळ- फळगळ होऊन लाखो रुपयांचे नुकसान, शासनाने शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी वगैरे. खरं तर या बातम्या वाचल्यानंतर त्यावर काय कृती कार्यक्रम पाहिजे किंवा त्यासाठी काय प्रयत्न झाले पाहिजेत, याबाबत मात्र फार काही चर्चा होताना दिसत नाही. मधमाशी पालनाचे महत्त्व १९२२ साली 'रॉयल कमिशन ऑफ ॲग्रीकल्चर'द्वारे ब्रिटिशांनी सांगण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही मधमाशी पालनासाठी खादी ग्रामोद्योग विभागाने प्रयत्न केले. परंतु आजही देशामध्ये मधमाशी पालनाचा वेग फारच कमी आहे.

### मध व्यवसायात महाराष्ट्र मागे

महाराष्ट्राचा विचार केला तर राज्यामध्ये मधमाशी पालनाने पाहिजे त्या प्रमाणात वेग घेतलेला नाही. देशाला शेतीचे मॉडेल देणारे राज्य मधमाशी पालनाबाबत मात्र खूपच पिछाडीवर आहे. अर्थात सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे मधमाशी पालनाचा शेती व्यवसायामध्ये महत्त्वाचा वाटा असूनही हा विषय कृषी विभागाकडे नसून खादी ग्रामोद्योग विभागाकडे आहे! अर्थात २०१८ साली मधमाशी पालनाला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घेतला. यासाठी नेमलेल्या कमिटीने देशामध्ये मधुक्रांती घडवून आणण्यासाठी काही ठोस उपाययोजना सुचविल्या आहेत. यामध्ये 'नॅशनल बी बोर्ड'ची स्थापना, मधुक्रांतीसाठी विशेष अभियान राबविण्यासाठी मोठी आर्थिक उपलब्धी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे हा विषय भारतीय कृषी अनुसंधान परिषद तसेच केंद्रीय कृषी मंत्रालयांतर्गत घेण्याचा निर्णय घेतला. यामुळे मधमाशी उद्योगाला थोडीशी उभारी येत आहे. मागील दोन-तीन वर्षांत मधमाशी पालनाबद्दल अनेक ठिकाणी चर्चा, प्रशिक्षण तसेच प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात येते ही समाधानाची बाब आहे. काही महिन्यांपूर्वी केंद्रीय कृषी मंत्रालयाने काढलेल्या आदेशात असे सांगितले आहे की, कृषी विभागांतर्गत आयोजित करण्यात येत असलेल्या विविध अनुदानाच्या योजना तसेच पीक प्रात्यक्षिकांमध्ये मधमाशीचा अंतर्भाव करावा. शेतकऱ्यांना शेती उत्पादन वाढविण्यासाठी मधमाश्यांच्या वसाहती उपलब्ध करून द्याव्यात. हा निर्णय उशिरा घेतला असला तरी स्वागतार्ह आहे. कारण मधमाश्यांच्या वसाहती पिकामध्ये परागीभवनासाठी ठेवल्या तर पिकाचे उत्पादन कमीत कमी २० टक्के तर जास्तीत जास्त १००-१५० टक्क्यांपर्यंत वाढू शकते, असे अनेक प्रयोगांतून सिद्ध झालेले आहे. शेती उत्पादन वाढविण्यासाठी अनेक निविष्ठांचा वापर केला गेला आणि त्यामुळे उत्पादनात भरीव वाढ झाली. परंतु आज मात्र याच पारंपरिक निविष्ठांचा वापर करून उत्पादन वाढविणे शक्य होत नाही असे दिसते.

### मधमाशी ही उपयुक्त जैविक कृषिनिविष्ठा

आज आपल्याकडे मधमाशी हाच एकमेव पर्याय आहे, ज्याद्वारे कमी खर्चात शेतीचे कमीत कमी २० ते ३० टक्के उत्पादन वाढू शकते. यावर सर्वांनी एकत्रित प्रयत्न केले तर मधमाशी पालनातून मधुक्रांती साध्य होऊ शकते. मधुक्रांती झाली तर शेतीच्या उत्पादन वाढीबरोबरच रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणात होऊ शकते. एकट्या महाराष्ट्राचा विचार केला तर १७५ लाख हेक्टरवर विविध पिकांची लागवड केली जाते. यापैकी १०० लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रावर जी पिके घेतली जातात त्यांच्या फुलांचा वापर मधमाशी पालनासाठी होऊ शकतो. एवढ्या मोठ्या क्षेत्रावरील फुलोऱ्याचा विचार केला तर महाराष्ट्रामध्ये कमीत कमी मधमाश्यांच्या २० लाख वसाहती वाढविता येतील. एवढ्या मोठ्या उद्योगातून कमीत कमी २० ते २५ हजार ग्रामीण तसेच शहरी भागातील समाजाला रोजगार उपलब्ध होऊ शकतो. मधमाश्यांच्या वसाहती तयार करण्यासाठी मधुबन तयार केले पाहिजे, यातून मधमाश्यांच्या चांगल्या प्रतीच्या वसाहती तसेच राणीमाशीची उपलब्धता करून त्यातून प्रत्येक जिल्ह्यात कमीत कमी १०० मधपाळ तयार झाले तर राज्यामध्ये ३००० ते ४००० मधपाळ तयार होतील. प्रत्येक मधपाळाकडे ५०० वसाहती असल्या तर, १५ ते २० लाख वसाहतींच्या माध्यमातून जिल्ह्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या पिकामध्ये परागीभवनासाठी मधमाश्यांच्या वसाहती उपलब्ध करून देता येतील. यातून हजारो कोटी रुपयांचे शेतीचे उत्पादन वाढेल. तसेच मधमाश्यांच्या काही वसाहती राज्यातील जंगलांमध्ये ठेवता येतील. यातूनही काही लोकांना रोजगार मिळेल. जंगलामध्ये असलेल्या आग्या मोहोळांपासून

शास्त्रोक्त पद्धतीने मध उत्पादन घेतले तर आग्या मोहोळांचे संरक्षण होऊन त्यापासूनही मोठ्या प्रमाणात मध आणि मेण मिळेल. मधमाशी पालन व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढला तर मध, मेण याबरोबरच परागकण, रॉयल जेली, प्रोपोलिस, बी व्हेनमसारखी मौल्यवान उत्पादनेही घेता येतील. आज बी व्हेनम म्हणजे मधमाशीचे विष हे ७ ते ८ हजार रुपये ग्रॅम म्हणजे सोन्यापेक्षा महाग विकले जाते. रॉयल जेलीसारखा पदार्थ १० ते ५० हजार रुपये किलोप्रमाणे विकला जातो. परागकणांचे उत्पादन सहज घेता येते आणि यालाही १००० ते १५०० रुपये किलो याप्रमाणे दर मिळतो.

## मधमाशी पालन सर्वार्थाने फायदेशीर

आज देशांतर्गत तसेच जागतिक बाजारपेठेत मधमाशीजन्य अशा सर्व पदार्थांना मोठी मागणी असून, त्याची पाहिजे त्या प्रमाणात उपलब्धता होत नाही. या महत्त्वाच्या बाबीसंदर्भात आजपर्यंत कृषी विभाग, कृषी विद्यापीठे, कृषी विकास केंद्रे तसेच शेतीविषयी काम करणाऱ्या संस्थांनी पाहिजे त्या प्रमाणात विचारच केला नाही. मधमाशीपालन हा एक उत्तम कृषि-पूरक व्यवसाय होऊ शकतो, असे  समाजाला सांगण्याचा प्रयत्न या योजनांच्या माध्यमातून कधीच झाला नाही ही खरी शोकांतिका आहे. मधमाशी पालन हा प्रमुख कृषिपूरक व्यवसाय झाला तर हा व्यवसाय करणाऱ्यांना रोजगार मिळेल तसेच या व्यवसायाला सेवा-सुविधा देण्यासाठी अनेक योजना पुढे येतील. यातूनही मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल. मधमाशी पालनाच्या माध्यमातून तयार झालेल्या उत्पादनांवर प्रक्रिया करता येईल, पॅकिंग, ब्रॅंडिंग आणि विक्री व्यवस्थेतूनही ग्रामीण तसेच शहरी भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल. आज अनेकांना मधमाशी पालन करायचे आहे, अनेक शेतकरी त्यांच्या पिकांमध्ये मधमाश्यांच्या वसाहती ठेवण्यासाठी तयार आहेत परंतु त्यांना मधमाशी पालनाची माहिती देणारी यंत्रणा अगदी अभावाने उपलब्ध आहे! अनेक ठिकाणी मधमाशी पालनाबद्दल तोंडी किंवा पुस्तकी माहिती दिली जाते. परंतु मधमाशी पालन व्यवसाय करण्यासाठी मधमाशीला योग्य रीतीने हाताळणे महत्त्वाचे आहे. म्हणजेच प्रशिक्षण केंद्रामध्ये मधमाश्यांच्या वसाहती असणे महत्त्वाचे आहे. एक लक्षात घेतले पाहिजे की, हा व्यवसाय पारंपरिक किंवा वडिलोपार्जित नाही; जो थोड्याशा किंवा ऐकीव माहितीवर सुरू करता येईल! या व्यवसायामध्ये यशस्वी होण्यासाठी कार्यानुभव तसेच कृती कार्यक्रमातून प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी प्रशिक्षण केंद्राकडे मधमाश्यांच्या वसाहती तसेच मध उद्योगाबद्दल माहिती देण्यासाठी तांत्रिक कर्मचारी वृंद असणे गरजेचे आहे. आजही यासंदर्भात खादी ग्रामोद्योग विभाग सोडून कोणतीही शासकीय योजना काम करत नाही.

## 'बसवंत उद्याना'चा 'मधु-क्रांती'मध्ये पुढाकार

मागील तीन वर्षांपासून नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव (बसवंत) येथे 'बसवंत मधमाशी उद्यान आणि मधमाशी पालन प्रशिक्षण केंद्रा'ची सुरुवात झाली आहे. खासगी आस्थापनेच्या माध्यमातून सुरू झालेले देशातील हे एकमेव मधमाशी उद्यान आहे. या केंद्रातर्फे राज्यातील अनेक शेतकरी, युवक, महिला यांना मधमाशी पालनाबद्दल माहिती देण्याचा उपक्रम सुरू आहे. आजपर्यंत येथे हजारो लोकांनी भेटी देऊन मधमाशीबद्दल माहिती जाणून घेतली. या केंद्रात दरवर्षी 'बसवंत मधुक्रांती परिसंवाद' आयोजित केला जातो. तसेच यशस्वी मधु-उद्योजकांना सन्मानित करून एक प्रकारे सामाजिक बांधिलकी जपण्याचा तसेच मधमाशी संवर्धनाबद्दल जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु केवळ एका 'बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्रा'च्या माध्यमातून व्यापक स्तरावर मधुक्रांती साध्य होणे कठीण आहे. यासाठी अनेक शासकीय तसेच इतरही खासगी संस्थांच्या माध्यमातून मधमाशी पालनाला पाठबळ देण्याची गरज आहे. आजपर्यंत हरितक्रांती, दुग्धक्रांती, फलोत्पादन क्रांती झाली, त्याचप्रमाणे मधुक्रांती होण्यासाठी सर्वतोपरी सांघिक प्रयत्न करण्याची गरज आहे. मळलेल्या वाटेने जाऊन प्रगतीचा आलेख उंचावत नाही. यासाठी नवनवीन वाटा शोधाव्या लागतात. या वाटा शोधताना किंवा त्यावरून मार्गक्रमण करताना अनेक अडचणी येतात. अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. परंतु म्हणतात ना, 'जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण' म्हणजेच 'टाकीचे घाव सोसल्याशिवाय दगडाला देवपण येत नाही!' हे सर्व लक्षात घेता, अशा साऱ्या अथक परिश्रमांची आणि सुजाण मधु-संकल्पाची तयारी ठेवून, २० मे या 'जागतिक मधमाशी दिना'निमित्त आपण सर्व जण मिळून मधमाशीच्या संवर्धनासाठी प्रयत्न करूया! ■

हे मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक **संजय भास्कर पवार** यांनी निर्मल ऑफसेट प्रा.लि., बी २७, एम.आय.डी.सी. माळेगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक येथे छापून ४, मिथिला अपार्टमेंट, आकाशवाणी केंद्राजवळ, दातेनगर, गंगापूर रोड, नाशिक- ४२२०१३ येथे प्रकाशित केले.

संपादक : **डॉ. भास्कर गायकवाड.**

* या अंकातील लेखांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.